सन २०१९ च्या मान्सून कालावधीत पर्जन्यवाढीसाठी उपाययोजना .....
तांत्रिक व आर्थिक निविदांची छाननी करण्यासाठी समितीची स्थापना..

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग (मदत व पुनर्वसन)
शासन निर्णय क्र.आव्यप्र- २०१९/प्र.क्र. १३१/आव्यप्र-१
मंत्रालय, मुंबई : ४०० ०३२.
दि. १०.६.२०१९

प्रस्तावना :

दुष्काळी परिस्थितीमुळे राज्यात होत असलेल्या आत्महत्या, त्यामुळे निर्माण होत असलेला जनक्षोभ आणि द्यावी लागणारी नुकसान भरपाई यासाठी मोठ्याप्रमाणावर शासनाचा खर्च होतो. पिण्यासाठी पाणी उपलब्ध करणे ही शासनाची मुख्य जबाबदारी असल्याने पाणी उपलब्ध असलेल्या ठिकाणावरून टंचाईग्रस्त भागातील लोकांना टंचाईच्या काळात टँकरद्वारे पाणी पुरवठा करावा लागतो.

राज्य मंत्रीमंडळाच्या दिनांक २८.५.२०१९ रोजी झालेल्या बैठकीत सन २०१९ च्या पावसाळयात पर्जन्यवाढीसाठी उपाययोजना म्हणजेच कृत्रिम पावसाचा प्रयोग करण्यास मान्यता देण्यात आली आहे. राज्य मंत्रीमंडळाच्या मान्यतेस अनुसरुन सदर प्रयोग करण्यासाठी प्राप्त होणा-या निविदांची छाननी करण्यासाठी समितीची स्थापना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

सन २०१९ च्या मान्सून कालावधीत पर्जन्यवाढीसाठी उपाययोजना म्हणजेच कृत्रिम पावसाचा प्रयोग करण्यासाठी प्राप्त होणा-या निविदांची तांत्रिक छाननी आणि आर्थिक निविदा उघडण्यासाठी खालील प्रमाणे समितीची स्थापना करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

सचिव (मदत व पुनर्वसन)	अध्यक्ष
सह सचिव, वित्त विभाग	सदस्य
भारतीय हवामान खाते, मुंबई यांचे प्रतिनिधी	सदस्य
आय.आय.टी.एम., पुणे यांचे प्रतिनिधी	सदस्य
वित्तीय सल्लागार व सह सचिव (आव्यप्र)	सदस्य
संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग	सदस्य सचिव

वरील समितीने प्राप्त होणा-या तांत्रिक व आर्थिक निविदांची छाननी करुन निवड होणा-या कंपनीची शिफारस शासनास करावी.

सदर आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०१९०६१०१४५४५७१४१९ असा आहे. सदर आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SHRIRANG SHRIPATI GHOLAP

Digitally signed by SHRIRANG SHRIPATI GHOLAP
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=9a2bc3b45be4b89f7c46c4474cf90b8a3c477e34c064494b04238ca50ee43db6, postalCode=400032, street=1ST FLOOR MAIN ROAD, MANTRALAYA, ou=REVENUE AND FOREST DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SHRIRANG SHRIPATI GHOLAP
Date: 2019.06.10 14:58:52 +05'30'

(श्रीरंग घोलप)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) संचालक, आय.आय.टी.एम., पुणे
३) उप महासंचालक, भारतीय हवामान खाते, मुंबई.
४) वित्तीय सल्लागार व सह सचिव, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय, मुंबई
५) आव्यप्र-१, संग्रहार्थ